MHSN120000512022

दाखल दिनांक – १३.०१.२०२२

नोंदणी दिनांक – १३.०१.२०२२

निकाल दिनांक – २१.०४.२०२६

कालावधी – ०४ वर्षे, ०३ महिने, ०८ दिवस.

पलूस येथील न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग यांचे न्यायालयात

(पिठासीन अधिकारी – एम.ए.एम.जे. शेख)

नियमित फौजदारी खटला क्र.१०/२०२२

नि.क्र.

**अभियोग पक्ष** — **महाराष्ट्र सरकार** तर्फे – पोलीस निरीक्षक,
**पलूस पोलीस ठाणे.**

**अभियोग पक्षातर्फे** — श्री.आर.आर. चांगण,सहा. सरकारी अभियोक्ता.

विरूध्द

**आरोपी** — **१. संदीप हिंदुराव पाटील,**
वय – ३२ वर्षे, धंदा – मजुरी,
**२. हणमंत तुकाराम मतकरी,**
वय – ५४ वर्षे, धंदा – शेती,
सर्व रा.आमणापूर, ता.पलूस, जि.सांगली,

**आरोपींतर्फे वकील** — श्री.एस.एन. चौगुले.

| | | |
|---|---|---|
| गुन्हा घडलेचा दिनांक | | ०८.०२.२०२० |
| गुन्हा रजिस्टर क्रमांक | | ३१/२०२० |
| दोषारोपपत्र दाखल दिनांक | | १३.०१.२०२२ |
| दोषारोपपत्र न्यायालयात दाखल दिनांक | | १३.०१.२०२२ |
| साक्षीपुरावा सुरु झालेचा दिनांक | | १३.१२.२०२२ |

| | | |
|---|---|---|
| युक्तिवाद दिनांक | | २१.०४.२०२६ |
| न्यायनिर्णय दिनांक | | २१.०४.२०२६ |
| दोषसिध्दी व शिक्षेबाबत आदेश | | निर्दोष मुक्तता. |

## आरोपीची माहिती

| अनु–क्रमांक | आरोपीचे नांव | आरोपीस अटक दिनांक | आरोपीस जामिनावर खुले केलेचा दिनांक | दोषारोपा–तील कलम | आरोपीस दोषमुक्त किंवा दोषसिध्द केले | आरोपीस झालेली शिक्षा | फौ.प्र.सं.क. ४२८ नुसार आरोपीने संपरिक्षे दरम्यान भोगलेली शिक्षा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १.<br><br>२. | संदीप हिंदुराव पाटील<br><br>हणमंत तुकाराम मतकरी | दि.०९.०२.२०२० रोजी आरोपींना फौ.प्र.सं.कलम ४१/अ प्रमाणे नोटीस दिली. | १३.१२.२०२२ | भा.दं.वि.क. ३२४, ३३६, ३३७, ५०४, ५०६ सह कलम ३४ प्रमाणे | निर्दोष मुक्तता | --- | --- |

## <u>अभियोग पक्षातर्फे घेतलेल्या साक्षीदाराची यादी</u>

| अ.क्र. | साक्षीदाराचे नांव | निशाणी क्र. | साक्षीदाराचे स्वरुप |
|---|---|---|---|
| १ | राजाक्का हिंदुराव पाटील | १९ | फिर्यादी |
| २. | संभाजी तुकाराम मतकरी | २३ | साक्षीदार |
| ३. | कृष्णात शिवाजी लोहार | २९ | पंच |

| | | | |
|---|---|---|---|
| ४. | विष्णु रामचंद्र मतकरी | ३१ | पंच |
| ५. | तुषार जगन्नाथ काळे | ३४ | पंच |

**अभियोग पक्षातर्फे सिध्द केलेले दस्तऐवज**

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | तपशिल |
|---|---|---|
| १. | नि.२० | फिर्याद |
| २. | नि.३०, ३२ व ३५ | घटनास्थळ पंचनामा वजा जप्ती पंचनामावरील सहीपुरती निशाणी |

**– न्यायनिर्णय –**

**(घोषणा तारीख– २१.०४.२०२६)**

प्रस्तूतचा खटला आरोपींविरुध्द भारतीय दंड संहिता, १८६० चे कलम ३२४, ३३६, ३३७, ५०४, ५०६ सह ३४ या अपराधांसाठी चालविण्यात आला.

२. **अभियोग पक्षाची थोडक्यात हकिकत अशी की,**

फिर्यादी– राजाक्का हिंदुराव पाटील हिने दि.०८.०२.२०२० रोजी फिर्याद देवून असे कथन केले की, दि.०८.०२.२०२० रोजी दुपारी २–०० वाजताच्या सुमारास चुलती गोजाबाई विठ्ठल मतकरी हिच्या वर्षश्राध्द कार्यक्रमामध्ये असताना आरोपी हा शिवीगाळ करत आला, आरोपी संदीप यास 'हिच्या अंगात लय मस्ती आहे, हिला तु मार' असे सांगितले असता आरोपी संदीप याने तिला कानपाडीत मारण्यास सुरुवात केली त्यामुळे ती खाली पडली असता तिच्या डोक्याच्या उजव्या बाजुला मार लागला तसेच, आरोपी हणमंत याने देखील तिला कानपाडीत मारुन जखमी केले तसेच, 'तुला जिवंत ठेवतच नाही' अशी धमकी दिली व तेथे पडलेल्या काठीने तिला मारहाण केली त्यावेळी फिर्यादीची

बहिण सुमन हजारे ही मध्यस्थ करण्याकरिता आली असता तिला देखील आरोपींनी मारहाण केली. तसेच, आरोपी हणमंत याने 'संभाजी याला बाहेर काढा त्यालादेखील सोडत नाही, त्यालाही मारणार आहे' असे सांगितले त्यानंतर फिर्यादी व तिचा भाऊ तक्रार देणेकरिता पोलीस ठाणेत गेले व पोलीसांनी त्यांना उपचारकरिता पाठविले त्यानंतर तिने प्रस्तुतची फिर्याद दाखल केली.

३. सदरची फिर्याद गुन्हा रजिस्टर नंबर ३१/२०२० ने नोंदविली व सदर गुन्ह्याचा तपास तपासी अधिकारी यांनी करुन तपास पूर्ण झाल्यानंतर न्यायालयात आरोपींविरुध्द दोषारोपपत्र दाखल केले.

४. माझे पुर्वपिठासीन अधिकारी यांनी आरोपींवर भा.दं.वि. कलम ३२४, ३३६, ३३७, ५०४, ५०६ सह ३४ अन्वये दोषारोप (निशाणी क्र.१३) ठेवून तो त्यांना वाचून दाखवला असता त्यांनी त्यांचेवरील सर्व आरोप नाकारले व सुनावणीस सामोरे जाण्याची तयारी दर्शवली आहे. अभिलेखावर आरोपींविरुध्द गुन्हादर्शक पुरावा आल्यामुळे आरोपींचे फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम ३१३ प्रमाणे निवेदन नोंदविण्यात आले. त्यात त्यांनी त्यांचेविरोधात खोटी केस काण्यात आल्याचे कथन केले, आरोपींना संधी असतानादेखील त्यांनी त्यांच्या बचावात कोणताही पुरावा सादर केला नाही.

५. सन्माननीय सरकारी अभियोक्ता व आरोपीतर्फे सन्माननीय वकीलांचा युक्तीवाद ऐकला. अभिलेखाचे बारकाईने अवलोकन केले.

६. अभिलेख, पुरावे व उभयबाजूंचा युक्तीवाद पाहता, सदर प्रकरणात निकालासाठी खालील मुद्दे निघतात, ते मुद्दे व त्यांचे निष्कर्ष कारणांसहित खालीलप्रमाणे आहेत.

| क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | दिनांक ०८.०२.२०२० रोजी दुपारी २-०० वाजण्याच्या सुमारास आमणापूर, ता.पलूस, जि.सांगली येथे आरोपींनी संगनमत करुन फिर्यादीस काठने मारहाण करुन ईच्छापुर्वक गंभीर दुखापत पोहोचविली व त्याअन्वये आरोपींनी भा.दं.वि.चे कलम ३२४ सह कलम ३४ प्रमाणे गुन्हा केला, हे अभियोग पक्षाने सिध्द केले आहे काय? | **नकारार्थी...** |
| २. | उपरोक्त नमूद तारीख, वेळ व ठिकाणी, सर्व आरोपींनी संगनमत करुन फिर्यादी व साक्षीदारास मारहाण करुन दुखापत पोहोचविली व इतरांच्या जिवीतास धोका निर्माण केला व त्याअन्वये आरोपींनी भा.दं.वि.चे कलम ३३६ सह कलम ३४ प्रमाणे गुन्हा केला, हे अभियोग पक्षाने सिध्द केले आहे काय? | **नकारार्थी...** |
| ३. | उपरोक्त नमूद तारीख, वेळ व ठिकाणी, सर्व आरोपींनी संगनमत करुन फिर्यादी व साक्षीदारास मारहाण करुन गंभीर दुखापत पोहोचविली व इतरांच्या जिवीतास धोका निर्माण केला व त्याअन्वये आरोपींनी भा.दं.वि.चे कलम ३३७ सह कलम ३४ प्रमाणे गुन्हा केला, हे अभियोग पक्षाने सिध्द केले आहे काय? | **नकारार्थी...** |
| ४. | उपरोक्त नमूद तारीख, वेळ व ठिकाणी, सर्व आरोपींनी संगनमत करुन फिर्यादी व साक्षीदारास शिवीगाळ व अपमान करून त्याला प्रक्षोभित केले व त्याअन्वये आरोपींनी भा.दं.वि.चे कलम ५०४ सह कलम ३४ प्रमाणे गुन्हा केला, हे अभियोग पक्षाने सिध्द केले आहे काय? | **नकारार्थी...** |
| ५. | उपरोक्त नमूद तारीख, वेळ व ठिकाणी, सर्व आरोपींनी संगनमत करुन फिर्यादी व साक्षीदारास जिवे मारण्याची धमकी दिली व दमदाटी केली व त्याअन्वये आरोपींनी भा.दं.वि.चे कलम ५०६ सह कलम ३४ प्रमाणे गुन्हा केला, हे अभियोग पक्षाने सिध्द केले आहे काय? | **नकारार्थी...** |

| | | |
|---|---|---|
| ६. | आदेश काय? | **अंतिम आदेशाप्रमाणे** |

**<u>–कारणमिमांसा–</u>**

**<u>मुद्दा क्र.१ ते ५ करिता –</u>**

**७.** आरोपींच्यावरील गुन्हा शाबीत करण्यासाठी अभियोग पक्षास आरोपींनी संगनमत करुन फिर्यादीस काठीने मारहाण केली तसेच फिर्यादी व इतरांच्या जिवीतास धोका निर्माण केला, शिवीगाळ करुन जिवे मारण्याची धमकी दिली याबाबी सिध्द करणे आवश्यक आहेत. अभियोग पक्षाने आरोपीवरील गुन्हा शाबीत करण्याच्या दृष्टीने साक्षीदार क्र.१ राजाक्का हिंदुराव पाटील यांची साक्ष पटलावर नोंदविले आहे. सदर साक्षीदाराने त्यांच्या साक्षीमध्ये घटना ही दि.०८.०२.२०२० रोजी घडली असल्याचे व त्यादिवशी गोजाबाई हिचा वर्षश्राध्दाला जेवायला घरी गेली होती व त्यावेळेस जेवण करुन येताना संभाजी मतकरी याच्या अंगणात उभी राहिली असता तिचा मुलगा संदीप पाटील तेथे आला व त्याला तु इथे का आलास, मी जे काय आपले बोलणे आहे ते आपण घरी बोलु असे सांगितले त्यानंतर तेथे आरोपी हणमंत आला व त्याने आरोपी संदीप याला 'हिला मस्ती आलेली आहे, हिला फोडुन काढ' असे सांगितले असता संदीपने तिच्या कानाखाली मारले तसेच, हणमंत यानेदेखील कानाखाली मारले व काठीने तिच्या डोक्याच्या उजव्या बाजुला मारले त्यावेळेस तिची बहिण सुमन हजारे भांडण मिटविण्यास आली असता आरोपी हणमंत याने तिच्या कानाखाली मारले व आरोपी संदीप याने तिला शिवीगाळ केली तसेच आरोपी हणमंत याने संभाजीाल बाहेर ओढा त्यालादेखील फोडा असे सांगितले. त्यावेळेस तिची आई आली व तिने भांडण मिटविले. त्यानंतर तिने निशाणी क्र.२० प्रमाणे तक्रार दिली व जप्त काठी आर्टिकल–अ वर असल्याचे ओळखले आहे. सदर साक्षीदाराने तिच्या उलटतपासात अरोपी संदीप व संभाजी यांच्यामध्ये हिशोबाच्या कारणावरुन वांदे होते व संभाजी व आरोपी हणमंत यांच्यामध्ये वैर असल्याचे उलटतपासात मान्य

केले आहे तसेच, सदर साक्षीदाराच्या साक्षीचे अवलोकन केले असता सदरची साक्षीदार ही घटनेबाबत अधिकचे कथन करीत असल्याचे दिसून येत आहे.

८. आरोपींनी गुन्हा शाबीत करण्यासाठी अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.२ संभाजी याची साक्ष पटलावर नोंदविली आहे. त्याने त्याच्या साक्षीत घटना फेब्रुवारी–२०२० मध्ये घडली असल्याचे व त्यादिवशी गोजाबाई हिचा वर्षश्राध्दाचा कार्यक्रम असल्याचे व दुपारी १–०० ते १–३० वाजण्याच्या सुमारास त्याच्या घराजवळ तो स्वतः, त्याची बहिण सुमन व राजाक्का, पत्नी सविता असे बसलेले असताना दोन्ही आरोपी त्याच्या घरामसोर शिवीगाळ करत आले व त्यांनी राजाक्का हिला शिवीगाळ केली. आरोपी हणमंत याने आरोपी संदीपला 'हिला लय मस्ती आली आहे, तु हिला बडव' त्यानंतर दोन्ही आरोपींनी राजाक्काला लाथाबुक्क्यांनी मारहाण केली त्यावेळेस सुमन ही सोडवायला गेली असता तिलादेखील आरोपींनी ढकलून दिले. जप्त काठी आर्टिकल–अ वर असल्याचे ओळखले आहे. सदर साक्षीदाराने त्याच्या उलटतपासात जमीनीच्या पैशासंदर्भात आरोपीसोबत वाद असल्याचे मान्य केले आहे तसेच, सदर साक्षीदाराच्या साक्षीचे अवलोकन केले असता सदरचा साक्षीदार हा घटनेबाबत अधिकचे कथन करीत असल्याचे स्पष्ट होत आहे.

९. साक्षीदार क्र.१ व २ यांनी तथाकथित घटनेबाबत त्यांच्या साक्षीमध्ये विस्तृतपणे उपापोह केला आहे परंतु, सदरदोन्ही साक्षीदारांनी संभाजी याचे आरोपीसोबत वाद असल्याची बाब उलटतपासादरम्यान मान्य केली आहे तसेच, सदरचे दोन्ही साक्षीदार हे घटनेबाबत अधिकचे कथन करत असल्याची बाब त्यांच्या साक्षीवरुन स्पष्ट होत आहे. अभियोग पक्षाच्या कथनानुसार तथाकथित घटनेच्यावेळेस सुमन, फिर्यादीची आई बाळकाबाई हजर असल्याची बाब स्पष्ट होत आहे. त्यामुळे साक्षीदार क्र.१ व २ यांची साक्ष पटलावरील इतर पुराव्याशी संलग्नीत करुन विचारात घेणे न्यायोचित होईल.

**१०.** अभियोग पक्षाने घटनास्थळ, जप्ती पंचनामा सिध्द करण्याकरिता साक्षीदार क्र.३ कृष्णात लोहार, साक्षीदार क्र.४ विष्णु मतकरी व साक्षीदार क्र.५ तुषार काळे यांची साक्ष पटलावर नोंदविली आहे. साक्षीदार क्र.३ ते ५ यांनी घटनास्थळ तसेच, जप्ती पंचनामा त्यांच्यासमक्ष केला नसल्याचे कथन केले आहे. तसेच, त्यांनी पंचनामा निशाणी क्र.३०, ३२ व ३५ प्रमाणे सह्या असल्याचे मान्य केले आहे. सहाय्यक सरकारी वकीलांनी सदर साक्षीदारास कलम १५४ भारतीय साक्ष पुरावा कायद्यान्वये उत्तरसुचक स्वरुपात प्रश्न विचारले परंतु पंचनामे सिध्द होईल असा कोणताही पुरावा पटलावर आला नाही तसेच, अभियोग पक्षास संधी असतानादेखील अभियोग पक्षाने प्रस्तुत प्रकणात तपासीक अंमलदार याची साक्ष नोंदविली नाही. त्यामुळे अभियोग पक्ष घटनास्थळ, जप्ती पंचनामा सिध्द करण्यास अपयशी ठरला.

**११.** साक्षीदार क्र.१ व २ यांनी त्यांना तथाकथित मारहाणीमध्ये दुखापत झाली असल्याचे कथन केले आहे परंतु, सदर साक्षीदारांच्या साक्षीवरुन वैद्यकीय प्रमाणपत्र सिध्द झाली असल्याची बाब ग्राह्य धरता येणार नाही. अभियोग पक्षास वैद्यकीय अधिकारी यांची साक्ष नोंदवून वैद्यकीय प्रमाणपत्र सिध्द करणे आवश्यक होते परंतु अभियोग पक्षास संधी असतानादेखील अभियोग पक्षाने प्रस्तुत प्रकणात वैद्यकीय अधिकारी यांची साक्ष नोंदविली नाही. त्यामुळे अभियोग पक्ष वैद्यकीय प्रमाणपत्र सिध्द करण्यास अपयशी ठरला. त्यामुळे साक्षीदार क्र.१ व २ यांना झालेल्या दुखापती अभियोग पक्ष सिध्द करण्यास अपयशी ठरला.

**१२.** अभियोग पक्षास संधी असतानादेखील अभियोग पक्षाने तथाकथित घटनेच्यावेळेस हजर असलेले साक्षीदार बाळकाबाई तसेच, सुमन यांची साक्ष पटलावर नोंदविली नाही त्यामुळे साक्षीदार क्र.१ व २ यांच्या साक्षीस कोणताही दुजोरा प्राप्त होवू शकला नाही व सदरची बाब अभियोग पक्षास घातक ठरत आहे. साक्षीदार क्र.१ व २ यांनी त्यांच्या साक्षीमध्ये शिवीगाळ संदर्भात कोणताही उपापोह

केला नाही. वर नमुद केल्याप्रमाणे अभियोग पक्ष घटनास्थळ पंचनामा, जप्ती पंचनामा व वैद्यकीय प्रमाणपत्र सिध्द करण्यास अपयशी ठरला तसेच, साक्षीदार क्र.१ व २ यांच्या साक्षीस कोणताही दुजोरा प्राप्त झाला नसल्याने अभियोग पक्ष आरोपींनी गुन्हा संशयापलीकडे सिध्द करण्यास अपयशी ठरला त्यामुळे मी मुद्दा क्र.१ ते ५ चे निष्कर्ष नकारार्थी नोंदवित आहे.

**मुद्दा क्र.६ करिता –**

**१३.** प्रस्तुत प्रकरणातील जप्त मुद्देमाल एक लाकडी कळुक हे मुल्यहीन असल्याने अपिल कालावधीनंतर नष्ट करण्याचे आदेश करणे योग्य व न्यायोचित ठरेल.

**१४.** उपरोक्त चर्चेवरुन व मुद्दा क्र.१ ते ५ वरील माझ्या नकारार्थी निष्कर्षावरुन असे निष्पन्न होते की, अभियोगपक्षाने आरोपींच्यावर ठेवलेले दोषारोप निःशंखपणे सिध्द केलेले नाहीत. करीता, आरोपी क्र.१ व २ हे प्रस्तुत खटल्यातुन निर्दोष सुटण्यास पात्र ठरत आहेत. अंततः, मुद्दा क्र.६ चे उत्तरार्थ मी खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

## आदेश

१. **आरोपी क्र.१) संदीप हिंदुराव पाटील आणि क्र.२) हणमंत तुकाराम मतकरी** यांची फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २४८(१) नुसार भा.दं.वि.सं. कलम ३२४, ३३६, ३३७, ५०४, ५०६ सह ३४ च्या गुन्ह्यांमधून निर्दोष मुक्तता करण्यात येत आहे.

२. आरोपींचे वैयक्तिक जातमुचलका व बंधपत्र रद्द करणेत येतात.

३. जप्त मुद्देमाल एक लाकडी कळुक हे मुल्यहीन असल्याने अपिल कालावधी संपल्यानंतर फौजदारी प्रक्रिया संहिताचे कलम ४५२ अन्वये नष्ट

करण्यात यावे.

४. आरोपींनी फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम ४३७–अ अंतर्गत वैयक्तिक जातमुचलका व बंधपत्र प्रत्येकी र.रु.१५,०००/– चे न्यायालयात सादर करावे.

**(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषीत केला)**

SHAIKH MOHAMMED AAMER
Digitally signed by SHAIKH MOHAMMED AAMER
Date: 2026.04.21 17:57:45 +0530

**पलूस.** **(एम.ए.एम.जे. शेख)**

**दिनांक– २१.०४.२०२६.** **न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,**

**पलूस.**

CERTIFICATE

I affirm that, the contents of this P.D.F. file are same, word to word, as per the original Judgment.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | : | Sou.G.A. Patil (Grade-3) |
| Court | : | M.A.M.J. Shaikh, C.J.J.D. & J.M.F.C., Palus, Dist.Sangli. |
| Date | : | 21.04.2026 |
| Judgment signed by the Presiding officer on | : | 21.04.2026 |
| Judgment uploaded on | : | 21.04.2026 |